जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 FEB 2020

तरुण भारत

# ‘दिव्यांगांचे प्रश्न शासनस्तरावर सोडवू’



कोल्हापूर : हुतात्मा अपंग बहुउद्देशीय संस्थेतर्फे हुतात्मा गौरव पुरस्काराचे वितरण आमदार चंद्रकांत जाधव,कुलगुरू डॉ. शिंदे,आयुक्त डॉ. कललशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रतिनिधी
कोल्हापूर

दिव्यांगांना आधार देण्यासाठी शासन कटीबध्द आहे. त्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आपण शासनस्तरावर प्रयत्न करणार आहे. असे प्रतिपादन आमदार चंद्रकांत जाधव यांनी केले. शाहू स्मारक येथे हुतात्मा अपंग बहुउद्देशीय विकास कल्याणकारी संस्थेचा राज्यस्तरीय चतुर्थ हुतात्मा गौरव पुरस्कार वितरण सोहळ्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, महापालिका आयुक्त डॉ. मल्लीनाथ कल्लशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कोल्हापूरचे पर्यटन वाढवण्यासाठी आपण प्रकल्प हाती घेतला आहे. या संस्थेचे काम ही चांगले असल्याने, त्यासाठी शासनस्तरावरील प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार चंद्रकांत जाधव यांनी सांगितले. अध्यक्षस्थानावरुन कुलगुरू देवानंद शिंदे म्हणाले, संस्थेचे व दिव्यांगाचे काम हे कौतुकाचे असून याचा समाजाने आदर्श घ्यावा. यावेळी आयुक्त डॉ. मल्लीनाथ कल्लशेट्टी यांनी शहर प्लास्टिक मुक्त करून स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. पहिल्या सत्रात निमंत्रकांचे कवी संमेलन झाले. यामध्ये अंध कवी चंद्रकांत देशमुख, नितीन चंदनशिवे, कवीवर्य बा.ह. मगदूम, सदानंद माळी आदींनी सहभाग घेतला. यावेळी विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या २२ व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष सुनिल फडतरे, अमोल कोरगांवकर यांच्यासह पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठात नोकरी प्रशिक्षण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील युजीसी स्कीम फॉर पर्सन वुईथ डिसॅबिलीटीज योजनेंतर्गत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयीन दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पाचदिवसीय नोकरी संदर्भातील प्रशिक्षण कार्यक्रम झाला. यात ४८ दिव्यांगांनी सहभाग नोंदवला. अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांच्या उपस्थितीत त्याचे उद्‌घाटन झाले. राजीव नायर व शिवा जयगोपाल यांनी दोन दिवस दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. शिवांगी वर्मा, संतोष पाटील यांनी दिव्यांगासाठी नोकरीच्या संधी कोठे आहेत, याची माहिती दिली. प्लेसमेंट ऑफिसर डॉ. जी. एस. राशिनकर यांनी दिव्यांगांसाठी नोकरीच्या संधी विषयावर, तर करिअर कॉन्सिलिंग सेंटरचे समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिव्यांगांनी नोकरीसाठी कोणती तयारी केली पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले. वाणिज्य व्यवस्थापन अधिविभाग प्रमुख डॉ. एस. एस. महाजन यांनी बँकिंग क्षेत्रातील नोकरीच्या संधी, प्रा. व्ही. एस. भोसले यांनी युपीएससी, एमपीएससी शिवाय सरकारी नोकरीच्या संधी विषयावर नोकरी संदर्भात मार्गदर्शन केले. युजीसी स्कीम फॉर पर्सन वुईथ डिसॅबिलीटीजच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांच्या हस्ते दिव्यांग विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले.

# संत सेवालाल महाराज यांची विद्यापीठात जयंती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

संत सेवालाल महाराज यांची जयंती शनिवारी शिवाजी विद्यापीठात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नितीन माळी, डॉ. संतोष सुतार यांच्यासह यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमधील शिक्षक, अधिकारी उपस्थित होते.

# दिव्यांगांसाठीचे प्लेसमेंट ट्रेनिंग उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यरत असणाऱ्या यूजीसी स्कीम फॉर पर्सन व्हिथ डिसॅबिलिटीज या योजनेंतर्गत दि. १० ते १४ फेब्रुवारी या कालावधीमध्ये विद्यापीठातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी व विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयीन दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पाचदिवसीय नोकरीसंदर्भातील प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या पाचदिवसीय ट्रेनिंग प्रोग्रामचे आयोजन यूजीसी स्कीम फॉर पर्सन व्हिथ डिसॅबिलिटीजच्या समन्वयक डॉ. प्रतिभा बी. देसाई यांनी केले होते.

यामध्ये ४८ दिव्यांगांनी आपला सहभाग नोंदवला. त्यांच्यासोबत त्यांचे काही पालकदेखील पाच दिवस उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी उद्घाटनप्रसंगी वाणिज्य व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते. दि. १० व ११ फेब्रुवारी, रोजी यूथ फॉर जॉब, मुंबईचे राजीव नायर व विन विनया, बेंगलोरचे संस्थापक शिवा जयगोपाल यांनी दोन दिवस दिव्यांग मुलांना प्लेसमेंट ट्रेनिंग दिले. तिसऱ्या दिवशी डॉ. रेड्डी फाऊंडेशन, पुणेच्या शिवांगी वर्मा व संतोष पाटील यांनी दिव्यांगांसाठी नोकरीच्या संधी विषयावर मार्गदर्शन केले. चौथ्या दिवशी शिवाजी विद्यापीठाचे प्लेसमेंट ऑफिसर डॉ. जी. एस. राशिनकर यांनी मार्गदर्शन केले. त्याचवेळी दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. कृष्णा पाटील यांनी मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रामधे वाणिज्य अधिविभागप्रमुख डॉ. एस. एस. महाजन मार्गदर्शन केले.

पाचव्या दिवशी प्रा. व्ही. एस. भोसले यांनी यूपीएससी, एमपीएससी शिवाय सरकारी नोकरीच्या संधी या विषयावर नोकरीसंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी दिव्यांग विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी मनोगत व्यक्त केले.

मटा अँकर **१३५३ सालापासूनच्या मोडी व संस्कृतमधील हस्तलिखितांची माहिती अभ्यासकांना मिळणार**

# विद्यापीठातील सात हजार हस्तलिखिते ऑनलाइन

**Udaysing.Patil**
@timesgroup.com
Tweet : udaysingpatilMT

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने जतन केलेल्या १३५३ सालापासूनच्या मोडी व संस्कृतमधील हस्तलिखितांची (मॅन्युस्क्रिप्ट) माहिती आता जगभरातील अभ्यासकांना मिळणार आहे. केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्ट (एनएमएम) अंतर्गत विद्यापीठातील ७ हजार हस्तलिखितांची यादी संकेतस्थळावर देण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यामध्ये वेदांत, धर्मशास्त्र, न्यायशास्त्र, ज्योतिष, वैद्यक, इतिहास, पुराण, साहित्य, काव्य, नाटक, योग अशा विषयांवरील हस्तलिखितांचा समावेश आहे.



सरकारच्यावतीने राबवण्यात येत असलेल्या प्रकल्पांतर्गत आतापर्यंत विद्यापीठातील सात हजार हस्तलिखितांची माहिती एकत्रित केली आहे. त्यासाठी मोडी व संस्कृतचे सर्व्हेअर काम करत होते. मध्यंतरी हा प्रकल्प सॉफ्टवेअरच्या अडचणींमुळे थांबला होता. पण २५ डिसेंबरपासून तो पूर्ववत सुरू झाला आहे. विद्यापीठातील काम पूर्ण झाल्याने आता या दोन भाषांचे सर्व्हेअर जिल्ह्यातील अन्य ठिकाणी व्यक्ती, संस्था, वाचनालयांकडे असलेल्या हस्तलिखितांची माहिती घेत आहेत. आतापर्यंत १२ हजार हस्तलिखितांची नोंद करण्यात आली आहे. त्याची यादीही एनएमएमवर देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या संग्रहात असलेल्या हस्तलिखितांमधील अनेक हस्तलिखिते १३५३ च्या आसपासची आहेत. कोल्हापूरचे व्ही. एन. पंडितराव, पंडित बालाचार्य खुपेरकर शास्त्री, बी. एस. प्रधान, श्रीमंत गणपतराव राजोपाध्ये, तासगावचे प्राचार्य बी. ए. बाबर, मुंबईतील निर्णयसागर प्रेस यांनी दिलेल्या ६९२३ हस्तलिखितांचा समावेश आहे. अतिशय दुर्मिळ असलेल्या या हस्तलिखितांचे विद्यापीठाच्या ग्रंथालयामध्ये संवर्धन करण्यात आले आहे. ज्यांना अभ्यासासाठी एखाद्या विषयांमधील, त्या परिसरातील जुनी माहिती हवी असल्यास ठिकठिकाणी पालथी घालावी लागत होती. तसेच संबंधित व्यक्ती, संस्थांना प्रत्यक्ष भेट द्यावी लागत होती. त्यामुळे अभ्यासाला प्रचंड वेळ लागत असते. आता एनएमएमच्या संकेतस्थळावर विषयानुसार त्यातील हस्तलिखितांची यादी देण्यात आली आहे. यामुळे एखाद्या विषयातील महत्वाची माहिती शिवाजी विद्यापीठातील हस्तलिखितामधूनही संशोधकाला मिळू शकते.





**विद्यापीठातील सात हजारांहून अधिक हस्तलिखितांची यादी एनएमएमच्या यादीमध्ये गेली आहे. त्याचा अभ्यासकांना मोठा उपयोग होऊ शकतो. याशिवाय जिल्ह्यात इतरत्र असलेल्या हस्तलिखितांचीही यादी तयार करण्यात येत असून १२ हजारांवर हस्तलिखितांची यादी तयार झाली आहे. त्यामुळे भविष्यात ठिकठिकाणचे संशोधक कोल्हापूरला येऊ शकतील.**

- **डॉ. नमिता खोत**, ग्रंथपाल,
शिवाजी विद्यापीठ

# धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा पाया महात्मा फुले यांनी घातला

## प्राचार्य टी. एस. पाटील; विद्यापीठात व्याख्यानमाला

कोल्हापूर, ता. १६ : धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा पाया घालणारे महात्मा फुले देशातील पहिले समाजसुधारक होते, असे मत प्राचार्य टी. एस. पाटील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातर्फे आयोजित सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील व्याख्यानमालेत ते ''सत्यशोधक समाज आणि सामाजिक परिवर्तन'' विषयावर बोलत होते. प्रा. डॉ. जगन कराडे अध्यक्षस्थानी होते.

प्राचार्य पाटील म्हणाले,'भारतीय समाजातील दैववाद, सनातन, ब्राम्हण्य वादाच्या परंपरेने भारतीय समाजाचे नुकसान झाले आहे. सनातनी परंपरेच्या विरोधात महात्मा



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातर्फे झालेल्या सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील व्याख्यानमालेत बोलताना प्राचार्य टी. एस. पाटील.**

फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करुन पुरोगामी विवेकवादी विचारांची पेरणी केली. त्यांनी या देशातील स्त्री, दलित आणि शेतकरी समाजाच्या उन्नतीसाठी अहोरात्र प्रयत्न केले. आजसुध्दा देशाच्या सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी महात्मा फुलेंच्या विचारांची गरज आहे.'

प्रा. कराडे यांनी महात्मा फुले यांच्या विचाराचे महत्त्व वर्तमानकालीन संदर्भामध्ये आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. कॉमर्स विभागाचे प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. अविनाश भाले उपस्थित होते. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. अभिजीत पाटील यांनी आभार मानले.

# दिव्यांगांसाठीचे प्लेसमेंट ट्रेनिंग उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यरत असणाऱ्या युजीसी स्कीम फॉर पर्सन व्हिथ डिसॅबिलीटीज या योजनेंतर्गत विद्यापीठातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी व विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयीन दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसीय नोकरी संदर्भातील प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडले. ४८ दिव्यांगांनी आपला सहभाग नोंदविला असून, त्यांच्यासोबत त्यांचे काही पालक देखील पाच दिवस उपस्थित होते. युजीसी स्कीम फॉर पर्सन व्हिथ डिसॅबिलीटीज समन्वयक डॉ. प्रतिभा बी. देसाई यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी उद्‌घाटनप्रसंगी डॉ. ए. एम. गुरव, अधिष्ठाता, वाणिज्य व्यवस्थापन विभाग हे उपस्थित होते.

# विद्यार्थी विकासासाठी स्पर्धा महत्त्वाच्या : डॉ. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी स्पर्धा महत्त्वाची भूमिका बजावतात, किंबहूना विविध प्रकारच्या स्पर्धांमुळे त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी स्पर्धा अत्यावश्यक असतात. न्यू होरायझनसारखे उपक्रम यासाठी आदर्श ठरतील, असे प्रतिपादन, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : रोपाला पाणी घालून उपक्रमाचा प्रारंभ करताना डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी आर. डी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, विभागप्रमुख डॉ. ए. ए. कलगोंडा व डॉ. ए. एम. शेख.**

प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेजच्या कॉम्प्युटर सायन्स व इलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे आयोजित 'न्यू होराईझन २ के २०' ही आंतर महाविद्यालयीन पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन, प्रोग्रॅमिंग स्किल टेस्ट उपक्रमाचा प्रारंभ डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाला. यंदा उपक्रमाचे १५ वे वर्ष होते. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन आर. डी. पाटील होते.

प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत केले. संयोजन डॉ. ए. ए. कलगोंडा व डॉ. ए. एम. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. एस एस. गुळवणी, प्रा. डॉ. व्ही एस. पाटील, प्रा. सुमेधराव गायकवाड, प्रा. विशाल पुणदीकर आदींनी केले. सूत्रसंचालन सृष्टी निर्मळे व शिवप्रताप साटम यांनी तर आभार मिनाक्षी नवाळे या विद्यार्थ्यांनी केले.